# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३


गोविग/विद्या/क्र/१०६६/२१ दि. ०८/०२/२०२१

## परिपत्रक

संदर्भः– १)शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण २०२१/प्र.क्र. ६/विशि–३ दिनांक ०३/०२/२०२१
२) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गडचिरोली दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१
३) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये ऑफलाईन वर्ग सुरू करण्याबाबत गठीत समितीचा अहवाल/नियमावली

उपरोक्त संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी तसेच पदव्युत्तर विभागाचे प्राध्यापक यांना सुचित करण्यात येते की, संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यिता विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ पासून सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गडचिरोली यांचे संदर्भिय क्र. २ च्या आदेशानुसार विद्यापीठ व महाविद्यालये सुरू करण्याकरिता परवानगी दिलेली आहे. सदर दोन्हीही संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने विद्यापीठाने डॉ. श्रीराम कावळे मा.प्र–कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने ऑफलाईन वर्ग काही नियम व अटीचे तंतोतंत पालन करून सुरू करण्याचा अहवाल/नियमावली संलग्नित केलेली आहे.

करिता विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयानी उपरोक्त तिनही संदर्भांचे अवलोकन करून व त्याचे पालन करून दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ पासून नियमित वर्ग सुरू करावे.

मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये,

८/२/२०२१
(डॉ.अनिल चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित:–**
१. मा.कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव कार्यालय,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. मा. अधिष्ठाता कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
६. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
७. मा. विभाग प्रमुख सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.
८. सर्व अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(डॉ. दिपक जुनघरे)
उपकुलसचिव(विद्या)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: ०३ फेब्रुवारी, २०२१.

**संदर्भः-** (१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचना.
(२) दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावनाः-**

कोव्हिड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन घोषित करण्यात आल्यामुळे शैक्षणिक संस्थांचे दैनंदिन कामकाज मार्च, २०२० पासून विस्कळीत झाले आहे. तथापि, राज्यातील कोव्हिड-१९ बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली असून सद्यस्थितीत ही साथ नियंत्रणाखाली आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये कोव्हिड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणीक वर्ष ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग सुरु करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे राहील. त्यानुसार राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रकः-**

१. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यातील प्रतिबंधित प्रक्षेत्रातील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका/नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी संबंधित विद्यापीठाने विचारविनिमय करुन, कोव्हिड-१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करुन नियमित वर्ग घेण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. याप्रकरणी संबंधित विद्यापीठांनी स्थानिक प्राधिकरणांची सहमती घेऊन महाविद्यालये सुरु करण्याच्या सूचना निर्गमित कराव्यात.

३. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जागेची उपलब्धता पाहून, ५०% पर्यंत विद्यार्थ्यांना रोटेशन पध्दतीने वर्गात प्रवेश देण्यात यावा.

४. कोव्हिड-१९ बाबत केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडण्यात येत आहे. त्यानुसार सर्व संबंधित विद्यापीठांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०२०३१७५७४२४५०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Pravinkumar Gulabrao Pawar

Digitally signed by Pravinkumar Gulabrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8de261729f06ede4a56aba947eceb6140d7406426b2f08c9317bea2458ec1f92, serialNumber=8f18625adb482a7ee2512cea93ce697388c95a99c89e41e85c05a3de8476488f, cn=Pravinkumar Gulabrao Pawar
Date: 2021.02.03 18:03:39 +05'30'

(प्रविणकुमार पवार)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
१०. मा.कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे
११. मा.कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१२. मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१३. मा.कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१४. मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१५. सर्व महानगरपालिका आयुक्त

१६. सर्व जिल्हाधिकारी

१७. प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१८. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे

१९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

२०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई

२१. निवडनस्ती (विशि-३).

**<u>मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त</u>**

राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंसोबत दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी १.०० वा. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु तसेच प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. तसेच संचालक, उच्च शिक्षण, पुणे व कार्यासन अधिकारी, विशि-३ हे प्रत्यक्ष उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी सर्व कुलगुरुंना विद्यापीठे व महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत आपली मते मांडण्यास सांगितले. त्यास अनुसरुन सर्व कुलगुरुंनी नियमित वर्ग सुरु करण्यास अनुकूलता दर्शविली.

मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.५ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांची सुरक्षितता व आरोग्य विचारात घेऊन, प्राप्त परिस्थितीत राज्यामधील विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्यास तत्वतः मान्यता देता येईल, असे मत व्यक्त केले.

या बैठकीत सविस्तर विचारविनिमय केल्यानंतर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:-

१. राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांचे एकमत झाले.
२. वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (SOP) विद्यापीठांनी तयार करावी.
३. विद्यार्थ्यांकरिता परीक्षा विद्यापीठांनी ऑनलाईन/ऑफलाईन अशा पध्दतीने विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार घेण्यात याव्यात.
४. चालू वर्षी कोव्हिड-१९ मुळे प्रत्येक विद्यापीठांच्या आदेशातील (Ordinances) तरतुदींनुसार विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५% बंधनकारक नसावी. विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत सक्ती करण्यात येऊ नये.
५. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची कोव्हिड-१९ करिता टेस्ट करण्याच्या आवश्यकतेबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्याशी विद्यापीठांनी चर्चा करावी.
६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पदवी/ पदव्युत्तर अभ्यासक्रम किती कमी करावयाचा याबाबत त्या-त्या विद्यापीठांनी निर्णय घ्यावा.
७. वसतीगृहे/ महाविद्यालये अनेक दिवस बंद अवस्थेत असल्याने त्यांचे इलेक्ट्रिक/ सेफ्टी ऑडिट करुन घेण्यात यावे.

तदनंतर सर्व संबंधितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

*********

# महाराष्ट्र शासन

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-४४२६०५
▸ टोल फ्री क्रमांक :१०७७ ▸ हॉटलाईन क्र.: २००७ ▸ दूरध्वनी क्र.: ०७१३२-२२२०३१,
▸ मोबाईल क्र.: ९४२३९११०७७ ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि- 160 /२०२१

दिनांक :- ४ फरवरी, २०२१

वाचा : १. मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई. अधिसूचना दि.१४.०३.२०२०
२. भारत सरकार, गृह विभाग, यांचे आदेश क्र. ४०-३/२०२०-DM-१(A), दिनांक २४.०३.२०२०
३. या कार्यालयाचे आदेश दिनांक ११.०३.२०२०, १६.०३.२०२०, २०.०३.२०२०, २२.०३.२०२०, २३.०३.२०२०, २६.०३.२०२०, ०३.०४.२०२०, १३.०४.२०२०, १७.०४.२०२०, १९.०४.२०२०, २४.०४.२०२०, ०३.०५.२०२०, ०८.०५.२०२०, १८.०५.२०२०, ३१.०५.२०२०, २५.०६.२०२०, २६.०६.२०२०, २७.०६.२०२०, २९.०६.२०२०, ०६.०७.२०२०, ३०.०७.२०२०, ३०.०९.२०२०, १४.१०.२०२०, २४.१०.२०, ३१.१०.२०, ०४.११.२०२०, १६.११.२०२०, १७.११.२०२०, २४.११.२०२०, २५.११.२०२०, ३०.११.२०२०, २२.१२.२०२०, ३१.१२.२०२०, २५.०१.२०२१
४. भारत सरकार, गृहविभाग, यांचे आदेश No. ४०-३/२०२०-DM-I (A) दिनांक १५.०४.२०२०, १९.०४.२०२०, २१.०४.२०२०, २४.०४.२०२०, २९.०४.२०, ०१.०५.२०२०, १५.१४.०५.२०२०, ३०.५.२०२०, २९.०७.२०२०, २९.०८.२०२०, २७.१०.२०२०, २१.११.२०२०, २३.११.२०२०, २८.१२.२०२०
५. आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई, महाराष्ट्र शासन, यांचे आदेश क्र. आव्यप्र/२०२०/ सीआर-९२/आव्यप्र-१/दि. २५/०३/२०२०, १५.०४.२०, १७.०४.२०२०, २१.०४.२०२०, २३.०४.२०, २४.०४.२०२०, २८.०४.२०२०, ३०.०४.२०२०, ०१.०५.२०२०, ०२.०५.२०२०, ०३.०५.२०२०, ०५.०५.२०२०, १५.०५.२०२०, १७.०५.२०२०, ३१.०५.२०२०, २०.०६.२०२०, २५.०६.२०२०, २९.०६.२०२०, २९.०७.२०२०, ३१.०८.२०२०, ३०.०९.२०२०, २९.१०.२०२०, ०३.११.२०२०, १४.११.२०२०, २३.११.२०२०, २७.११.२०२०, २४.१२.२०२०, २९.१२.२०२०, १४.०१.२०२१
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्रमांक: प्र.क्र.१८०/ एसडी-६, दिनांक १०.११.२०२०
७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन पत्र क्रमांक: प्र.क्र.१४०/एसडी-६, दिनांक १७.११.२०२०
८. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्रमांक.संकिर्ण २०२०/ प्र.क्र.२०४/एसडी-६, दिनांक १८.०१.२०२१
९. उच्च व तंत्र शिक्षण विभाग.महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्रमांक.संकिर्ण २०२१/प्र.क्र.६/ विशि-३ दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२१

# आदेश

(कोविड-१९ साथरोगसंदर्भाने मिशन बिगीन अगेन अंतर्गत जिल्ह्यातील विद्यापीठ/महाविद्याल सुरु करणेसंबधांत मार्गदर्शक तत्वे)

**ज्याअर्थी,** संदर्भिय अधिसूचना क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र राज्यात दिनांक १३.०३.२०२० पासून साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. या अधिनियमाअंतर्गत खंड २, ३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणू (कोविड-१९) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास

प्रतिबंध करणे याकरीता या कार्यालयाचे संदर्भिय २ नुसार विविध आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत व सद्यस्थितीत सदर आदेशाच्या तरतुदी गडचिरोली जिल्ह्यात लागू आहेत.

**ज्याअर्थी**, या कार्यालयाचे आदेश क्र. १३२ दिनांक २९ जानेवारी,२०२१ अन्वये, फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये जिल्हयात मनाई आदेश दिनांक ०१ फरवरी, २०२१ रोजी ००.०१ वा. पासुन ते दिनांक २८ फरवरी , २०२१ रोजी मध्यरात्री २४.०० वा. पर्यंत ग्रामीण, नागरी व औद्योगिक क्षेत्रात जमावबंदी आदेश लागू करण्यात आलेले आहे. **तथापि**, उक्त संदर्भ क्रमांक ९ अन्वये शासन पत्र, परिपत्रकान्वये विद्यापीठ शिक्षण पुन्हा सुरु करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे प्राप्त झालेले आहे.

**ज्याअर्थी**, फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ खालील तरतुदीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्हयातील नागरी, ग्रामीण तसेच औद्योगिक क्षेत्रातील जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशुन या कार्यालयाचे संदर्भ क्र. ०३ वर नमुद यापूर्वी लॉकडाऊन संदर्भात या कार्यालयाकडून निर्गमित उक्त आदेशातील प्रतिबंधात्मक बाबींपैकी जिल्ह्यातील विद्यापीठ/महाविद्यालये सुरु करणेबाबत सुधारित आदेश काढणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी, मी दीपक सिंगला, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली** वरील संदर्भ क्र. ९ चे शासन परिपत्रक व पत्रातील निर्देशांच्या अधिन राहून शासन निर्देशाप्रमाणे कोविड - १९ साथरोग अंतर्गत गडचिरोली जिल्हा सीमाक्षेत्रामध्ये *(कंटेनमेंट झोन वगळून)* **जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनातंर्गत येत असलेले विद्यापीठ/महाविद्यालय चे सर्व वर्ग, वसतीगृह दिनांक १५ फरवरी, २०२१ पासून सुरु करण्यास परवानगी देत आहे.** *(संदर्भिय शासन निर्णय क्रमांक ९ मधील मार्गदर्शक निर्देशांचे पालन करणे सर्व संबधितांना बंधनकारक असेल.)*

सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**सदरचे आदेश आज दिनांक ०४/०२/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.**

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**

**प्रतिलिपी- माहितीस्तव सादर**

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.सचिव,आपत्ती व्यवस्थापन ,मदत व पुनर्वसन प्राधिकरण, मंत्रालय मुंबई -३२
४) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
५) मा. आयुक्त, शिक्षण विभाग, पुणे

**माहितीस् तथा उचित कार्यवाहीस**

६) मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ
७) कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ

**माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित**

८) पोलीस अधिक्षक, गडचिरोली

९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली

१०) सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, आयटीडीपी गडचिरोली/अहेरी/भामरागड

११) अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली/अहेरी

१२) जिल्हा शल्य चिकीत्सक,गडचिरोली यांनी संदर्भ शासन निर्णय क्र. ९ मधिल निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

१३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. गडचिरोली

१४) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)

१५) **जिल्हा माहिती अधिकारी गडचिरोली यांनी वरीलप्रमाणे बाब विनामुल्य प्रसिद्ध करावी.**

१६) सहा.आयुक्त, समाजकल्याण विभाग, गडचिरोली

१५) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि. प. गडचिरोली

१६) प्राचार्य, डायट, गडचिरोली

१७) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)

१८) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि. प. गडचिरोली

१९) स्थळ प्रत

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील ऑफलाईन वर्ग सुरु करणेसंदर्भात दि. ०८/०२/२०२१ रोजी दु. ०३.०० वाजता पार पडलेल्या सभेचा अहवाल.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रम व प्रगतीच्या दृष्टीने, केंद्र व राज्य शासनाच्या कोव्हिड-१९ संदर्भात मार्गदर्शक सुचना व निर्देशांना अनुसरुन विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये ऑफलाईन वर्ग सुरु करण्याबाबत समिती गठित करण्यात आली व यासंदर्भात चर्चा करण्याकरीता दि. ०८/०२/२०२१ रोजी दु. ०३.०० वाजता गोंडवाना विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये विद्यापीठाचे मा. प्र-कुलगरु (प्र.), डॉ. श्रीराम कावळे यांचे अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले. आयोजित सभेला खालीलप्रमाणे मान्यवर उपस्थित होते. डॉ. अनिल चिताडे, कुलसचिव (प्र.) यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व तद्नंतर सभेला सुरुवात करण्यात आली.

१) डॉ. श्रीराम कावळे, प्र-कुलगुरु(प्र), गोंडवाना विद्यापीट, गडचिरोली.
२) डॉ. अनिल चिताडे, कुलसचिव (प्र.) तथा संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीट, गडचिरोली.
३) डॉ. सुरेश रेवतकर, अधिष्टाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४) डॉ. सुनिल साकुरे, सुशिलाबाई रामचंद्र मामीडवार कॉलेज ऑफ सोशल वर्क, चंद्रपूर.
५) डॉ. जे. पी. देशमुख, आदर्श आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, वडसा, जि. गडचिरोली.

कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचना व निर्देश तसेच खालील नमुद संदर्भांना अनुसरुन खालील नियम व अटींचे तंतोतंत पालन करुन गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग सुरु करावे.

संदर्भ :- १) विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.D.O.१४-८/२०२० (CPP-II), दि. ०५/११/२०२०.
२) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३, मंत्रालय मुंबई, दि. ०३.०२.२०२१.
३) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कार्यालय ,गडचिरोली यांचे आदेश जि.का./क्र.कार्या-३/अका. आव्यक/कावि-१६०/२०२१, दि. ०४/०२/२०२१.

१. उक्त सदंर्भ क्र. १ व २ ला अनुसरुन गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग दि. १५ फेब्रूवारी, २०२१ पासून सुरु करावे.
२. नियमित वर्ग सुरु करण्याच्या एक दिवसापुर्वी सर्व वर्गखोल्या, कार्यालये, परिसर व वॉशरुम सॅनिटाईझ करुन घ्यावे व सदर प्रक्रिया दररोज नियमित सुरु ठेवावी. गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी सॅनिटाईझ मशीन बसवावी व वेळोवेळी सर्वांना हात सॅनिटाईज करण्यास सुचित करावे. महाविद्यालयांतील परिसरात सर्वांना तोंडावर मास्क व्यवस्थित लावण्यास बंधनकारक करावे. कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) संदर्भातील मार्गदर्शक सुचना बॅनर/पोस्टर द्वारे खुल्या ठिकाणी प्रदर्शित करावे. सदर नियमांचे तंतोतंत पालन होत आहे किंवा कसे? याची पाहणी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी करेल. कोणीही कोरोना संदर्भातील प्रचलित नियमांचे उल्लंघन करताना आढळल्यास संबंधितांवर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.
३. महाविद्यालयांतील वर्ग दोन शिफ्टमध्ये आयोजित करावे. दोन्ही शिफ्ट ३-३ तासाचे ठेवावे. चालू शिफ्टमध्ये मधला कोणतीही लघु विश्रांती ठेवू नये ज्यामुळे विद्यार्थ्यांची गर्दी टाळता येईल. शिफ्टच्या वेळेचे नियोजन सर्व संबंधीत महाविद्यालयांनी आपआपल्या स्तरावर करावी.

४. महाविद्यालयांतील फक्त ऑफलाईन वर्ग सुरु करण्यास परवानगी असेल. शैक्षणिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त राष्ट्रीय सेवा योजना, क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम, वा इतर कोणत्याही कार्यक्रमास सक्त मनाई असेल. कोणतेही कार्यक्रम, वा समारंभाचे आयोजन करावयाचे असल्यास त्यासाठी संबंधित प्रशासन/विभाग/कार्यालयाकडून विशेष परवानगी प्राप्त करुनच कार्यक्रम/समारंभाचे आयोजन करावे.

५. महाविद्यालयांतील वसतिगृहे, उपहारगृहे, खानावळ इ. केंद्र व राज्य शासनाच्या कोव्हिड-१९ संदर्भातील प्रचलित नियमांना अनुसरुन सुरु करावे. वसतिगृहात विद्यार्थांना प्रवेश देताना संबंधित विद्यार्थ्यांची कोव्हिड-१९ ची RT-PCR ची चाचणीची तपासणी करुन त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर वसतिगृहातील प्रवेशाची कार्यवाही घ्यावी. वसतिगृहामध्ये सॅनिटाईझर मशीन बसवावी. वसतिगृहातील एका खोलीमध्ये फक्त २ विद्यार्थ्यांना राहण्याकरीता ठेवावे.

६. महाविद्यालयांतील स्मार्टफोन हाताळणाऱ्या सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी आरोग्य सेतु ॲप डाऊनलोड करुन नियमित एक्टीव्हेट करुन ठेवणे बंधनकारक राहील.

७. विद्यार्थ्यांना ऑफलाईन क्लासेसमध्ये दाखल व्हायचे असल्यास सर्वप्रथम पालकाचे त्यासंदर्भात संमतीपत्र घेवूनच दाखल करुन घ्यावे.

८. ऑफलाईन वर्ग सुरु झाल्यापासून महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची दररोज नियमित सुरक्षित अंतरासह थर्मल स्क्रिनींग करावी, हात सॅनिटाईज करण्यास सुचवावे. एका बेंचवर एकच विद्यार्थी बसवावे.

अशाप्रकारे आफलाईन वर्ग सुरु करणेबाबत चर्चा झाली. तद्नंतर विद्यापीठाचे मा. कुलसचिव (प्र.), डॉ. अनिल चिताडे यांनी अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सांगता केली.

८/२/२०२१

(डॉ. अनिल चिताडे)
मा. कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

08/02/2021

(डॉ. श्रीराम कावळे)
मा. प्र-कुलगुरु(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली